# वरोरा पोलीसांची दारू तस्करांविरूध्द कार्यवाही
# १२ लक्ष ३० हजाराचा मुदद्ेमाल हस्तगत

दिनांक १८/०६/२०१९ रोजी वरोरा येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी रेनॉल्ट डस्टर वाहनाने नागपुर ते चंद्रपुर कडे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून वरोरा पोलीस पथकाने नंदोरी हायवे चौक येथे नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी करीत असतांना, मिळालेल्या माहितीप्रमाणे एक रेनॉल्ट डस्टर वाहन येतांना दिसले सदर वाहनास थांबवुन संशयावरून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये अवैधरित्या २२ पेटया देशी दारू किं. २,२०,०००/—रू, दारू वाहतुकीकरीता वापरलेली रेनॉल्ट डस्टर क्रं. एम.एच.३४बी.एफ.५८३१ १०,००,०००/—रू एक सॅमसंग मोबाईल फोन किं. १०,०००/—रू, **असा एकुण १२,३०,०००/—रू** चा मुदद्ेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन वरोरा येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १) नरेंद्र पोचम आसमपल्ली वय ३६ रा. बल्लारशाह यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास वरोरा पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात वरोरा प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील, यांचे नेतृत्वात पोना. मदन येरणे, पोशि. निखिल कौरासे, अनुप पाटील यांनी पार पाडली.

---